1779/14

अर्ज क्र.............. कलम
अर्जदाराचे नांव :- श्री मच्छिंद्र रा.जाधव
नकलेचा अर्ज आला तो दिनांक:- 21/5/2014
नकल तयार दि.:-
नकल दिली तो दि.:- 22/5/2014

(२)

संस्थेचे ज्ञापन

महा. 984 /२०१३/पुणे
दिनांक 27/6/२०१३/पुणे

सहाय्यक संस्था निबंधक
पुणे विभाग, पुणे

१) संस्थेचे नांव : " श्री.संत सावता माळी शिक्षण प्रसारक मंडळ "
संस्थेचा पत्ता द्वारा-श्री. मच्छिंद्र रामचंद्र जाधव, गोजूबावी ता.बारामती, जि.पुणे
*Mo. No.:9822191826*

अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय पुणे विभाग पुणे

३) संस्थेचे ध्येय व उद्देश:

शैक्षणिक :

१. निरक्षरता निर्मूलनासाठी साक्षरतेचा पुरस्कार करणे

२. शिक्षणाचा प्रसार व प्रचार करणे, बालवाडी, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालय, डी. एड., बी. एड., नाईट स्कूल व महाविद्यालय, अभियांत्रिकी पदवी, पदविका अभ्यासक्रम, पॅरामेडिकल अभ्यासक्रम, व्यवस्थापनशास्त्राचे अभ्यासक्रम व इतर शैक्षणिक क्षेत्रातील संस्था सुरु करणे अशिक्षितांकरीता प्रौढ वर्ग चालविणे.

३. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी अभ्यासिका, पुस्तकपेढी सुरु करणे. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी बक्षिस योजना सुरु करणे. केंद्र व राज्यशासनाच्या ग्रंथालय योजना सुरु करणे.

वैद्यकीय :

१. आरोग्यविषयक विविध कार्यक्रमा बाबत माहिती देणे.

२. एड्सविषयी विविध उपक्रमांद्वारे जनजागृती करणे.

३. नैसर्गिक आपतीचे वेळी म्हणजेच भूकंप, पूर, दुष्काळाच्या वेळी त्वरित मदत कार्य सुरु करणे

४. आपत्कालीन वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हावी याकरीता योजनात्मक प्रयत्न करणे

५. रक्तदान शिबीर, कुटुंब नियोजन शिबीर आयोजित करणे.

६. लहान बालकांसाठी आरोग्य विषयक, पोलीओ डोस आदी शिबीरांचे आयोजन करणे.

७. परिसरातील डॉक्टरांची नामावली तयार करुन गरजूंना सेवा उपलब्ध करुन देणे.

सामाजिक :

१. शिवजयंती, गणेशोत्सव, दत्त जयंती व नवरात्र महोत्सव साजरे करणे.

२. महिलांना मार्गदर्शन करणे, तसेच त्यांना पापड, लोणची, मसाला, खडू, मेणबत्ती, राखी, उदबत्ती,फाईल, फॅन्सी हेअर, फॅन्सी बॅग, प्लास्टीक मोल्डींग संबंधी प्रशिक्षण देऊन मार्गदर्शन करणे.

३. पर्यावरणविषयक संरक्षण व संवर्धनात्मक कार्यक्रम बाबत माहिती देणे

४. हुंडाबंदीचा प्रचार व प्रसार करणे. नशाबंदीचा प्रचार व प्रसार करणे.

५. अस्पृश्यता निवारणात्मक कार्यक्रमा बाबत माहिती देणे व त्यातून त्यांचा सर्वांगीण विकास करणे.

६. सर्व प्रकारचे सामाजिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय कार्यक्रम व उत्सव साजरे करणे. विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे.

७. अंध, अपंग, मतिमंद व मूकबधिरांचे विकासात्मक व पुनर्वसनात्मक विविध उपक्रम बाबत माहिती देणे.

| श्री.मच्छिंद्र रामचंद्र जाधव | श्री. राहूल रामचंद्र जाधव | सौ.अश्विनी मच्छिंद्र जाधव |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी |

क्रिडा:

१.युवकांमध्ये सर्व प्रकारच्या खेळांची व व्यायामाची आवड निर्माण करणे. त्यांना प्रशिक्षण देणे. खेळाचे व व्यायामाचे साहित्य उपलब्ध करुन देणे. सामने भरविणे.

२. युवकांमध्ये खेळ व व्यायामाबद्दल उत्सुकता निर्माण करुन त्यांना खेळ व व्यायामाचे अद्यावत प्रशिक्षण देणे. व्यायामशाळा स्थापन करणे व बांधणे

३. किक, बॉक्सिंग, मार्शल आर्ट बद्दल युवकांमध्ये उत्सुकता निर्माण करणे.

४. महिलांसाठी स्वसंरक्षणासाठी कराटे, मार्शल आर्टबद्दल प्रशिक्षण देऊन त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे.

५. पारंपारिक देशी खेळ उदा. आट्यापट्या, सुरपारंब्या, मल्लखांब, लाठी फिरविणे, खो-खो, मुदगल फिरविणे, मातीतील कुस्ती, जोरबैठका, दंड आदींबद्दल युवकांना माहिती देऊन त्यांच्या आवडीप्रमाणे खेळांमध्ये त्यांना निष्णात व पारंगत करुन त्यांना स्पर्धांमध्ये भाग घेण्यास संधी उपलब्ध करुन देणे. धर्नुविद्या, ॲथलॅटिकस, बॅटमिंटन, बॉस्केटबॉल, बुद्धीबळ, कॅरम, क्रॉसकंट्री, क्रिकेट, फुटबॉल, जिमनॅस्टीक, रिदमीक जिम्नॅस्टीक, हॉकी, हँडबॉल, ज्युदो, खो.खो., कब्बड्डी, लॉनटेनीस, जलतरण, टेबलटेनीस, हॉलीबॉल, वेटलीफ्टींग, वॉटरपॉलो, फॅनसिंग, मल्लखांब, रोलरस्केटींग, सॉफ्टबॉल, सायकलींग, थ्रो बॉल, बेसबॉल, टेनिकाईड आदींबद्दल युवकांना माहिती देऊन त्यांच्या आवडीप्रमाणे खेळांमध्ये त्यांना निष्णात व पारंगत करुन त्यांना स्पर्धांमध्ये भाग घेण्यास संधी उपलब्ध करुन देणे. निष्णात व उत्कृष्ट प्रशिक्षकांची प्रशिक्षणासाठी नेमणूक करणे.

६. पोहणे या क्रिडाप्रकारासाठी स्विमींग टँकची सोय उपलब्ध करुन देणे.

७. व्यायामासाठी जिम्नॅशियमची सोय उपलब्ध करुन देणे.

कला :

१. सामाजिक बांधिलकी ठेवून रंगभूमीचा कला व क्रिडा क्षेत्राचा विकास करणे. सर्वमान्य समाजसुधारणा चळवळीत रंगभूमीचा उपयोग करणे. व्यावसायिक व हौशी नाट्य व कला संस्थातील दुरावा नाहीसा करणे.

२. नाट्य, नभोवाणी, दूरदर्शन व चित्रपट या माध्यमातील सर्व घटक अभिनय त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करणे. नाट्य, नभोवाणी, दूरदर्शन व चित्रपट, शॉर्ट फिल्म या माध्यमांच्या तंत्राची ओळख करुन घेणे व समाजासाठी त्यांचा उपयोग करणे.

३. जुने नावाजलेले व नवोदित लेखक तसेच कवी यांच्याकडून समाजपोषक, कलात्मक लिखाण लिहून घेण

कृषी :

१. सेंद्रिय शेती, गांडुळ शेती, मिश्रपिक, पिकांची फेरपालट, जीवाणू खते, निसर्ग शेती, चार सूत्री भात शेती व किफायतशीर शेतीबाबत मार्गदर्शन, प्रात्यक्षिक मेळावे, प्रशिक्षण शिबीर, प्रत्यक्ष क्षेत्रावर कार्यक्रम सुरु करणे.

२. कोरडवाहू फळझाडे लागवड, औषधी-सुगंधी वनस्पती लागवड, रोप वाटिका मार्गदर्शन, नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर, मार्गदर्शन करणे

३. सुधारित बियाणे वापर, रासायनिक खतांचा समतोल वापर, हिरवळीची खते, सुधारित अवजारे, पिक संरक्षणात किटकनाशके शेवटचा पर्याय, पाण्याची बचत, प्रमाणशीर पाणी-ठिबक/तुषार सिंचन मार्गदर्शन, प्रात्यक्षिक मेळावे, प्रशिक्षण शिबीर, प्रत्यक्ष क्षेत्रावर कार्यक्रम सुरु करणे.

४. शेती आधारित स्थानिक उद्योग - डाळ मशिन, मळणी यंत्र, युरिया ब्रिकेटस् मशिन, भात लागवड मशिन, माहिती, उपलब्धता, कर्ज प्रकरणाबाबत मार्गदर्शन करणे.

५. कृषी वाचनालय, फिरते कृषि प्रदर्शन, कृषी प्रशिक्षण शिबीर, प्रत्यक्ष क्षेत्रावर कार्यक्रम सुरु करणे.

| | | |
|---|---|---|
| श्री.मच्छिंद्र रामचंद्र जाधव<br>अध्यक्ष | श्री. राहूल रामचंद्र जाधव<br>उपाध्यक्ष | सौ.अश्विनी मच्छिंद्र जाधव<br>सेक्रेटरी |

(५)

६. सौर ऊर्जा, निर्धुर चुली, सोलर कुकर वापर मार्गदर्शन, प्रात्यक्षिक मेळावे, प्रशिक्षण शिबीर, प्रत्यक्ष क्षेत्रावर कार्यक्रम सुरु करणे.

७. शेतीस जोड धंदे, मधुमक्षिका पालन, रेशीम पैदास-तुतीची लागवड, आळिंबी लागवड, हरित गृह, टिशू कल्चर, मार्गदर्शन, प्रात्यक्षिक मेळावे, प्रशिक्षण शिबीर, प्रत्यक्ष क्षेत्रावर कार्यक्रम सुरु करणे.

८. शेत उत्पादनाची प्रतवारी, पॅकिंग, मार्केटिंग, धान्य सुरक्षा, साठवण मार्गदर्शन करणे

९. मृद तपासणी, सूक्ष्म मूलद्रव्ये तपासणी, पाणी तपासणी महत्व, मार्गदर्शन करणे

१०. ~~रोजगार उपलब्धता, रोजगार मार्गदर्शन,~~ प्रशिक्षण फळप्रक्रिया उद्योग, ~~गरजू होतकरू बेरोजगार~~ युवकांना ~~शासकीय योजनेतील अल्पकालीन तांत्रिक प्रशिक्षणास पाठविणे~~

११. कृषी विषयक शासकीय योजना, अनुदान माहिती, मार्गदर्शन करणे, मराठी किंवा इंग्रजीमधून कृषी विषयक नियतकालिक काढणे

१२. ~~वैयक्तिक क्षेत्राचा पाणलोट विकास महत्व, पाणलोट क्षेत्र विकासातील मृद व जल संधारणाचे विविध योजनांचे महत्व, मार्गदर्शन व कामे करणे.~~

१३. खते, किटकनाशके, बी बियाणे बाबतचे कायदे, ग्राहकांचे हित रक्षण, तक्रारीबाबतची कार्यवाही, मार्गदर्शन करणे

१४. कृषीसंबंधी शेतकऱ्याची अभ्यास सहल आयोजित करणे.

१५. श्रम प्रतिष्ठा, व्यक्तिमत्व विकास शिबीर, सामान्य ज्ञान वाढविणे

" **श्री.संत सावता माळी शिक्षण प्रसारक मंडळ** "या संस्थेच्या नियम व नियमावलीप्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सदर संस्थेची व्यवस्था व कारभार सोपविण्यात आलेला आहे अशा कार्यकारी मंडळाच्या सभासदांची संपूर्ण नावे व पत्ते, हुद्दे, वय, व्यवसाय व राष्ट्रीयत्व खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | सभासदाचे नाव व पत्ता | हुद्दा | वय | व्यवसाय | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री मच्छिंद्र रामचंद्र जाधव<br>**गोजूबावी ता.बारामती, जि.पुणे** | अध्यक्ष | २८ | नोकरी | भारतीय |
| २. | श्री.राहूल रामचंद्र जाधव<br>**गोजूबावी ता.बारामती, जि.पुणे** | उपाध्यक्ष | ३० | नोकरी | भारतीय |
| ३. | सौ. अश्विनी मच्छिंद्र जाधव<br>**गोजूबावी ता.बारामती, जि.पुणे** | सेक्रेटरी | २८ | नोकरी | भारतीय |
| ४. | कु. दुर्गावती नंदकुमार फुले<br>मु.पो.सणसर ता.बारामती पुणे | खजिनदार | २३ | नोकरी | भारतीय |
| ५. | सौ.रूपाली राहूल जाधव<br>**गोजूबावी ता.बारामती, जि.पुणे** | सभासद | २४ | गृहिणी | भारतीय |
| ६. | सौ.सुनिता नंदकुमार फुले<br>मु.पो.सणसर ता.बारामती पुणे | सभासद | ५३ | नोकरी | भारतीय |
| ७. | श्री. रामचंद्र निवृत्ती जाधव<br>**गोजूबावी ता.बारामती, जि.पुणे** | सभासद | ५२ | शेती | भारतीय |

आम्ही खाली सह्या करणारे " **श्री.संत सावता माळी शिक्षण प्रसारक मंडळ** " चे सदस्य जाहीर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येऊन "

| | | |
|---|---|---|
| श्री.मच्छिंद्र रामचंद्र जाधव<br>अध्यक्ष | श्री. राहूल रामचंद्र जाधव<br>उपाध्यक्ष | सौ.अश्विनी मच्छिंद्र जाधव<br>सेक्रेटरी |

**श्री.संत सावता माळी शिक्षण प्रसारक मंडळ** "ही संस्था आज दिनांक १३/०४/२०१३ रोजी स्थापन केली असून ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही ज्ञापनावर सह्या केल्या आहेत.

| अ.क्र. | सभासदाचे नाव | सही |
|---|---|---|
| १. | श्री मच्छिंद्र रामचंद्र जाधव | |
| २. | श्री.राहूल रामचंद्र जाधव | |
| ३. | सौ. अश्विनी मच्छिंद्र जाधव | |
| ४. | कु. स्मवती नंदकुमार फुले | |
| ५. | सौ.रूपाली राहूल जाधव | |
| ६. | सौ.सुनिता नंदकुमार फुले | |
| ७. | श्री. रामचंद्र निवृत्ती जाधव | |

वरील सह्या करणाऱ्यांना मी ओळखतो व त्यांनी माझ्या समक्ष त्या विधानपत्रावर / ज्ञापनावर सह्या केल्या आहेत

स्थळ : पुणे

दिनांक 3/१/२०१३

अॅड. ज्ञानेश डी. शहा,<br>
आदिनाथ शॉपिंग सेंटर,<br>
पुणे सातारा रोड, पुणे ३७<br>
मो. नं. ९८२२४०१०५६

**प्रमाणपत्र**

" **श्री.संत सावता माळी शिक्षण प्रसारक मंडळ** " द्वारा-श्री. मच्छिंद्र रामचंद्र जाधव, गोजूबावी ता.बारामती, **जि.पुणे**या नावाची अथवा नावात साम्य असणारी दुसरी कोणतीही संस्था पुणे जिल्ह्यात १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमानुसार नोंदणी झालेली नाही.

| श्री.मच्छिंद्र रामचंद्र जाधव | श्री. राहूल रामचंद्र जाधव | सौ.अश्विनी मच्छिंद्र जाधव |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी |

(6)
(५)

महा. ९८४ /२०१३/पुणे
दिनांक २७/६/२०१३/पुणे

सहाय्यक संस्था निबंधक
पुणे विभाग, पुणे

परिशिष्ट 'क'
संस्थेचे नियम व नियमावली

संस्थेचे नांव:- '' श्री.संत सावता माळी शिक्षण प्रसारक मंडळ ''
संस्थेचा पत्ता द्वारा-श्री. मच्छिंद्र रामचंद्र जाधव, गोजूबावी ता.बारामती, जि.पुणे
*Mo. No.:9822191826*

**१. नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्या :**

अ. संस्था - संस्था म्हणजे संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मु. रा. वि. व्य. अधिनियम १९५० अन्वये नोंदविण्यात येणारी संस्था होय.

ब. उद्देश - ज्ञापनातील कलम ३ खाली येणारे उद्देश.

क. सभासद - संस्थेचे सभासद म्हणजे नियम व नियमावलीनुसार प्रवेश दिलेली व्यक्ती व जिने आपल्या सभासदत्वाची वर्गणी दिलेली आहे.

ड. कार्यकारी मंडळ - संस्थेचे कार्यकारी मंडळ म्हणजे संस्थेच्या नियम व नियमावलीनुसार संस्था ज्यांचेवर संस्थेचे व्यवस्थापन सोपविले आहे असे मंडळ.

**२. संस्थेचे कार्यक्षेत्र :** संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य असे राहील.

**३. हिशोबाचे वर्ष :** संस्थेचे हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

**४. सभासदत्व व त्याची नोंदणीची पद्धत :**

संस्थेचे ध्येय धोरण व उद्देश मान्य असलेल्या कोणत्याही १८ वर्षे पूर्ण केलेल्या व्यक्तीस संस्थेचे सभासद होता येईल. सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीने संस्थेकडे असणारा नमुना अर्ज भरुन अध्यक्ष, सेक्रेटरी यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. त्यास योग्य मंजुरी मिळाल्यानंतर अर्जदार व्यक्तीस सभासदाचे हक्क प्राप्त होतील. सभासदत्व मंजुरी करण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

**५. सभासदांचे प्रकार :** १) आजीव सभासद (२) सामान्य सभासद (३) संस्थापक सभासद

१) आजीव सभासद :

जी व्यक्ती संस्थेस एकरकमी रु. १०००/- देईल तीस ''आजीव सभासद'' असे संबोधण्यात येईल.

२) सामान्य सभासद :

जी व्यक्ती संस्थेस प्रतिवर्षी एकरकमी रु. १२०/- देईल तीस ''सामान्य सभासद'' असे समजणेत येईल.

३) संस्थापक सभासद :

संस्थेच्या ज्ञापनात पहिले कार्यकारी मंडळ म्हणून ज्यांची नावे नमूद केली आहेत त्यांना संस्थापक सभासद समजणेत येईल व त्यांना वार्षिक वर्गणी रु. १००/- भरावी लागेल.

**६. सभासदत्व रद्द होणे :**

१. एखाद्या सभासदाचा मृत्यू झाल्यास

२. सभासदाने राजीनामा दिल्यास

३. सभासदास फौजदारी वा नैतिक अध:पतनाच्या गुन्ह्याबद्दल शिक्षा झाल्यास

४. सभासदाची वागणूक संस्थेच्या ज्ञापन व नियम व नियमावलीचे विरुद्ध तसेच संस्थेच्या हिताविरुद्ध असल्यास

५. कार्यकारी मंडळाने विहीत केलेल्या वेळेत वार्षिक वर्गणी न दिल्यास

| श्री.मच्छिंद्र रामचंद्र जाधव | श्री. राहूल रामचंद्र जाधव | सौ.अश्विनी मच्छिंद्र जाधव |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी |

वरीलप्रमाणे कोणत्याही कारणास्तव सभासदाचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

**७. सर्वसाधारण सभा, तिचे अधिकार आणि तिचे कार्य :**

संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे वर्ष संपलेपासून सहा महिन्याचे आत कार्यकारी मंडळाने घेतली पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत वार्षिक सभा वर्ष संपलेपासून सहा महिन्याचे आत झाली नाही तर २/३ सभासदांनी लेखी अर्ज केल्यास, अध्यक्ष यांनी आपल्या अधिकारात सभाबोलाविली नाही तर एकूण सभासदांच्या ३/५ सभासदांनी एकत्र येऊन अशी सभा घेण्याबद्दल योग्य तो निर्णय घेऊ शकतील व त्यानुसार होणाऱ्या सभेतील ठराव संस्थेवर बंधनकारक राहतील.

संस्थेच्या सर्वसाधारण सभेची खालीलप्रमाणे कामे राहतील –

१. मागील सभेचा वृत्तांत, कार्यकारी मंडळाने सादर केलेला जमाखर्च, ताळेबंद अंदाजपत्रक मंजूर करणे

२. कार्यकारी मंडळाची निवड करणे

३. पुढील वर्षासाठी हिशोब तपासनीसाची नियुक्ती करणे

४. नियम व नियमावलीमध्ये दुरुस्ती असल्यास त्यास मान्यता

५. ध्येय धोरण व कार्य यांची चर्चा करणे

६. आयत्या वेळी आलेल्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे

**८. सर्वसाधारण सभेची सूचना व गणसंख्या :**

१. कार्यकारी मंडळाने ठरविलेल्या दिवशी, वेळी व ठिकाणी सर्वसाधारण सभा भरविण्यात येईल.

२. वार्षिक सभेची नोटीस सभेपूर्वी १५ दिवस अगोदर संस्थेचे सर्व सभासदांना (यु.पी.सी.) किंवा हस्तदेय पोच घेऊन देणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणाने एखाद्या सभासदास नोटीस मिळाली नाही तर त्याचा परिणाम सभेवर होणार नाही किंवा सभेत घेतलेल्या निर्णयावर होणार नाही.

३. संस्थेला खरोखरी उपयोगी होतील अशा व्यक्तींना निमंत्रित व निरिक्षक म्हणून कार्यकारी मंडळास बोलविता येईल.

४. सभेची गणसंख्या, संस्थेच्या सभासद संख्येच्या ३/५ इतकी राहील. परंतु गणसंख्या अभावी तहकूब झालेली सभा लगेच अर्ध्या तासाने बोलविली जाईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.

**९. विशेष सर्वसाधारण सभा व तिची कार्ये :**

कार्यकारी मंडळास सर्व सभासदांपुढे एखादी महत्वाची गोष्ट ठेवावयाची असल्यास अगर एखाद्या विशेष प्रसंगी सर्वसाधारण सभा घेता येईल. त्यावेळी वार्षिक सर्वसाधारण सभेचे सर्व नियम पाळण्यात येतील. तसेच पटावरील २/३ सभासदांनी लेखी अर्ज केल्यास जादा सर्वसाधारण सभा अध्यक्षांनी बोलविली पाहिजे.

**१०. संस्थेचे कार्यकारी मंडळ, पदाधिकारी व त्यांची रचना :**

१. संस्थेचे कार्यकारी मंडळ कमीत कमी ७ व जास्तीत जास्त ९ सभासदांचे राहील.

२. कार्यकारी मंडळात अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी, खजिनदार, ~~कार्याध्यक्ष~~, ~~उपसेक्रेटरी~~, ~~उपखजिनदा~~र असे पदाधिकारी व बाकीचे सभासद राहतील.

३. पदाधिकारी हे निवडून आलेले कार्यकारी मंडळ, त्यांच्यातून निवडतील.

| | | |
|---|---|---|
| श्री.मच्छिंद्र रामचंद्र जाधव | श्री. राहूल रामचंद्र जाधव | सौ.अश्विनी मच्छिंद्र जाधव |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी |

## ११. कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणुकीची पद्धत :

१. कार्यकारी मंडळाच्या पदांची निवड दर ५ वर्षांनी केली जाईल.

२. कार्यकारी मंडळाच्या पदांची निवड दर ५ वर्षांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत बहुमताने करण्यात येईल.

३. एखादा ट्रस्टी मयत झाल्यास किंवा निघून गेल्यास त्याची जागा बाकीचे ट्रस्टी भरतील.

## १२. कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कार्ये :

अध्यक्ष:

१. वार्षिक सर्वसाधारण सभा, विशेष सर्वसाधारण सभा व कार्यकारी मंडळातील सभेचे अध्यक्षपद स्वीकारुन नि:पक्षपणे सभा पार पाडणे

२. समसमान मत विभागणी झाल्यास निर्णायक जादा मत देणे

३. सेक्रेटरी यांनी संस्थेचे कामकाज सुरळीत व नियमित पार पाडले नाही तर स्वत:च्या अधिकारात कार्मकारी मंडळाची, वार्षिक सर्वसाधारण सभा बोलाविणे

४. संस्थेच्या कार्यावर/कारभारावर देखरेख ठेवणे

५. संस्थेच्या कागदपत्रावर सह्या करणे

उपाध्यक्ष:

१. अध्यक्षांचे अनुपस्थितीत अध्यक्षांची सर्व कामे करणे. संस्थेच्या सभांचे अध्यक्षस्थान भूषविणे अशा सभेत त्यांना समसमान मते पडल्यास जादा मत देण्याचा अधिकार राहील.

२. अध्यक्षांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात मदत करणे

सेक्रेटरी:

१. संस्थेच्या ध्येयधोरणानुसार व कार्यकारी मंडळाच्या सुचनेनुसार संस्थाचे दैनंदिन कामकाज पहाणे

२. संस्थेचा पत्रव्यवहार व दप्तर सांभाळणे

३. वेळच्य वेळी कार्यकारी मंडळाच्या व संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभा अध्मक्षांना पूर्वपरवानगीने बोलविणे, त्याचा वृत्तात ठेवणे

४. कार्यकारी मंडळ व संस्थेचा नोकरवर्ग यांचा दुवा म्हणून संबंध ठेवणे व त्यांचे दैनंदिन कामावर देखरेख ठेवणे संस्थेचा कायदेशीर प्रतिनिधी म्हणून काम पहाणे

खजिनदार:

१. संस्थेत जमा होणारा निधीचा हिशोब सुव्यवस्थित ठेवणे जमाखर्चाचा हिशोब ठेवणे

२. मासिक व वार्षिक अंदाजपत्रक तयार करुन कार्यकारी मंडळापुढे ठेवणे

३. हिशोब, ताळेबंद पत्रक वगैरे तयार करणे

४. संस्थेच्या किरकोळ खर्चासाठी खजिनदार यांचेकडे रु. ३००/- मात्र ठेवण्याचे अधिकार राहतील.

~~उपाध्यक्ष: अध्यक्षांना दैनंदिन कामकाजात मदत करणे [illegible]~~

~~सहसेक्रेटरी: सेक्रेटरीच्या अनुपस्थितीत सेक्रेटरीचे सर्व कामे करणे.~~

~~सहखजिनदार: खजिनदारांच्या अनुपस्थितीत खजिनदारांचे सर्व कामे करणे.~~

सभासद: संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सभांना वेळोवेळी हजर राहून संस्थेच्या कामात मदत करणे

## १३. कार्यकारी मंडळाची सभा व मागणीच्या सभा :

| | | |
|---|---|---|
| श्री.मच्छिंद्र रामचंद्र जाधव | श्री. राहूल रामचंद्र जाधव | सौ.अश्विनी मच्छिंद्र जाधव |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी |

१. कार्यकारी मंडळाची सभा तीन महिन्यातून एक वेळ तरी बोलविली पाहिजे. अध्यक्ष यांचे गैरहजेरीत उपाध्यक्ष हे कामकाज पाहतील.

२. कार्यकारी मंडळाच्या २/३ सभासदांनी लेखी अर्ज केल्यास किंवा कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांपुढे एखादी महत्वाची गोष्ट ठेवायची असल्यास अगर एखाद्या विशेष प्रसंगी कार्यकारी मंडळाची विशेष सभा अध्यक्ष बोलवितील. अशा सभेस मागणीची सभा संबोधण्यात येईल.

## १४. कार्यकारी मंडळाचे सभेची सूचना व गणसंख्या :

१. कार्यकारी मंडळातील सर्व सभासदांना सभेची नोटीस सभेच्या दिनांकाच्या ७ दिवस अगोदर पोस्टाने (यु.पी.सी.) किंवा हस्तदेय पद्धतीने दिली पाहिजे.

२. विशेष प्रसंगी कार्यकारी मंडळाची सभा न घेता परिपत्रकान्वये सभा घेण्यात येईल. तथापि अशा सभेतील सर्व निर्णय हे एकमताने झाले पाहिजेत. जर एकमताने अशा सभेतील निर्णय न झाल्यास सदरहू निर्णयासाठी पुढील सभेत विषय मांडण्यात येईल.

३. कार्यकारी मंडळाने सभेत एकूण ३/५ सभासदांची उपस्थिती ही गणसंख्या मानण्यात येईल. तथापि गणसंख्येअभावी सभा तहकूब झालेली सभा लगेच अर्ध्या तासाने बोलविली पाहिजे. सदरहू गणसंख्येने बंधन राहणार नाही.

## १५. कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम :

१. कार्यकारी मंडळाच्यापदांची निवड दर ५ वर्षांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत करण्यात येईल. निवडणुकीची सर्व व्यवस्था अस्तित्वात असलेले कार्यकारी मंडळ करील. आवश्यकता असल्यास त्यासाठी निवडणुकीचे नियम तयार करतील.

२. ज्यावर्षी निवडणूक असेल त्या वर्षाच्या वार्षिक सर्वसाधाण सभेचे नोटीसीमध्ये तसा स्पष्ट उल्लेख करण्यात येईल व उमेदवारी अर्ज मागविण्यात येतील.

३. कार्यकारी मंडळाची निवडणूकीची पद्धत ठरविण्याचा अधिकार त्यावेळी अस्तित्वात असलेले कार्यकारी मंडळास राहील.

## १६. कार्यकारी मंडळातील रिक्तपद भरण्याबाबत :

कार्यकारी मंडळातील कोणत्याही कारणाने मुदतपूर्व रिकामी झालेली जागा, कार्यकारी मंडळातील राहिलेले अन्य सदस्य, उर्वरित मुदतीकरीता इतर सभासदांकडून स्विकृत सभासद घेऊन भरतील व तसा बदल अर्ज विहित नमुन्यात मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे क्षेत्र यांना सादर करतील.

## १७. कार्यकारी मंडळाचे कार्य व अधिकार :

१. संस्थेकरीता देणगी, अनुदान, वर्गणी, मृत्यूपत्राने अथवा बक्षिसपत्राने अथवा अन्य पद्धतीने मिळणारी मिळवत, विनाअट किंवा योग्य अटींसह स्विकारणे अथवा नाकारणे.

२. संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहणे, नोकर वर्गाची नियुक्ती करणे. त्यांचे सेवाशर्तींचे नियम ठरविणे. संस्थेच्या देण्याघेण्याचे व्यवहार पहाणे, नवीन उपसमित्या नेमणे, संस्थेच्या ध्येय धोरणानुसार काम पहाणे.

३. हिशोब तपासनीसाकडून जमाखर्च व ताळेबंद पत्रक तयार करून घेऊन वार्षिक सभा घेणे संस्थेचे हिशोब सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमातील तरतुदीनुसार ठेवून त्याचे परिक्षण चार्टर्ड अकौंटंट अगर पब्लिक ऑडिटरकडून करवून घेऊन विहित नमुन्यात मा. संस्था निबंधक, पुणे यांचे कार्यालयात दरवर्षी नियमित पाठविणे.

४. संस्थेची पुढील कार्याची दिशा व अंदाजपत्रक तयार करणे.

| | | |
|---|---|---|
| श्री.मच्छिंद्र रामचंद्र जाधव | श्री. राहूल रामचंद्र जाधव | सौ.अश्विनी मच्छिंद्र जाधव |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी |

५. वार्षिक सभेने केलेले ठराव, आदेश व धोरणात्मक गोष्टी अंमलात आणणे.

६. संस्थेच्या नियम व नियमावलीमध्ये दुरुस्ती, नवीन नियम अगर इतर शिफारशी वार्षिक सभेत करणे.

७. संस्थेच्या उद्दिष्टांशी अनुरुप असलेल्या इतर संस्थांचे आर्थिक व इतर प्रकारचे सहाय्य मिळविणे.

## १८. संस्थेचे निधी, मिळकत व विनियोग :

सभासद वर्गणी, देणग्या, शासकीय व निमशासकीय अनुदान, कायदेशीर मार्गाने व्याजी / बिनव्याजी कर्ज, वित्तीय संस्थांकडून अनुदान इ. संस्थेचा असे निधी समजण्यात येईल. सदरहू निधीचा विनियोग संस्थेच्या उद्देशावर केला जाईल.

## १९. उद्दिष्टनिहाय खर्चाची तरतूद :

संस्थेच्या दर वर्षेप्रमाणे येणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक उद्दिष्टांसाठी २०%, शैक्षणिक उद्दिष्टांकरीता ४०%, आरोग्यविषयक उद्दिष्टांकरीता २५% त्याप्रमाणे संस्थेच्या व्यवस्थापनासाठी १५% खर्चाची तरतूद वर दाखवल्याप्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| ज्ञापनातील उद्देशासाठी | ८५% |
| व्यवस्थापकीय उद्देशासाठी | १५% |
| एकूण | १००% |

उद्दिष्टनिहाय खर्चाचे टक्केवारीत बदल करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

## २०. कर्ज किंवा ठेवी या संबंधी तरतूद :

संस्थेस कायदेशीर मार्गाने कर्ज किंवा ठेवी घेता येतील. त्यापूर्वी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ३५ व ३६ प्रमाणे मा. सह धर्मादाय आयुक्त पुणे विभाग, पुणे यांची रितसर लेखी परवानगी घेण्यात येईल.

## २१. स्थावर मालमत्ता खरेदी व विक्री करणे संबंधी तरतूद :

संस्थेस योग्य वाटल्यास आवश्यक स्थावर मिळकत खरेदी करता येईल. तसेच संस्थेची मालमत्ता विकता येईल. त्याबाबतचा संपूर्ण अधिकार कार्यकारी मंडळास राहील. परंतु त्यासाठी संस्थेच्या कार्यकारी मंडळाला मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम व्यवस्था १९५० चे कलम ३६ अन्वये पूर्तता करुन मा. सह धर्मादाय आयुक्त, पुणे यांची रितसर परवानगी घेण्यात येईल.

## २२. बँक खाते :

संस्थेचा निधी राष्ट्रीयकृत बँकेत अथवा शासनाने मान्यता दिलेल्या बँकेत संस्थेच्या नावे खाते उघडून ठेवला जाईल. पैसे देण्याचा अगर काढण्याचा व्यवहार हा संस्थेचे अध्यक्षांची सही कायम राहील तसेच सेक्रेटरी व खजिनदार यांचेपैकी कोणत्याही दोघांच्या संयुक्त सहीने करण्यात येईल.

## २३. सभासदांची यादी ठेवण्याची पद्धत :

१. संस्थेच्या नोंदणी कायदा १८६० चे कलम १५ नुसार व १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियमातील नियम १५ प्रमाणे अनुसूची ६ चे नमुन्यात सभासदांची यादी ठेवण्यात येईल.

२. संस्था नोंदणी कायदा १८६० चे कलम ४ प्रमाणे व संस्था नोंदणी कायदा महाराष्ट्र १९७० चे कलम ७ प्रमाणे अनुसूची १ च्या नमुन्यात दरवर्षी कार्यकारी मंडळाची यादी मा. सहाय्यक संस्था निबंधक, पुणे यांचे कार्यालयात पाठविण्यात येईल.

३. संस्था नोंदणी कायदा १८६० चे कलम ४ अ प्रमाणे संस्था नोंदणी कायदा महाराष्ट्र १९७१ चे नियम ८ प्रमाणे दरवर्षी संस्थेत नोकरीस लागलेल्या व्यक्तींच्या नोकरीसंबंधी अटीबाबतचे विवरणपत्र अनुसूची २ चे नमुन्यात मा. सहाय्यक निबंधक पुणे यांचेकडे

| | | |
|---|---|---|
| श्री. मच्छिंद्र रामचंद्र जाधव | श्री. राहूल रामचंद्र जाधव | सौ. अश्विनी मच्छिंद्र जाधव |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी |

पाठविणेत येईल.

**२४. संस्थेचे नाव किंवा उद्देशात बदल :**

संस्थेचे नाव किंवा उद्देशात बदल करावयाचा असेल अथवा दोन संस्थांचे विलीनीकरण करावयाचे असेल तर सन १८६० च्या संस्था नोंदणी कायद्यातील कलम १२ किंवा १२ अ यातील असणाऱ्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

**२५. नियम आणि नियमावलीत बदल करण्याची तरतूद मा. सहाय्यक संस्था निबंधक व सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्या परवाणगीने :-**

कार्यकारी मंडळाने अगर बहुसंख्य सभासदांनी रचालू नियम व नियमावलीत दुरुस्ती सुचवली असेल तर वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या ३/५ बहुमताने असा ठराव मंजूर करण्यात येईल. मात्र घटना, नियम व नियमावलीचा दुरुस्तीचा मसुदा प्रत्येक सभासदास नोटीसीबरोबर पाठविला जाईल. तसेच कुठल्याही प्रकारचा बदल नावात/ज्ञापनात/नियमावलीत करायचा झाला तर प्राधीकर अधिकार यांच्या माहिती साठी सुद्धा एक प्रत त्यांना दिली जाईल.

**२६. संस्थेचे विसर्जन :** संस्था विसर्जन करावयाची झाल्यास ३/५ ब हुमताने सर्वसाधारण सभेत मंजुरी घ्यावी लागेल व संस्था नोंदणी सन १८६० चे अधिनियमातील कलम १३ व १४ प्रमाणे संस्था विसर्जनाची कार्यवाही करण्यात येईल. संस्था विसर्जित करावयाची झाल्यास त्या उर्वरीत मिळकत/पैसे सर्व देणे वगळता जी काही रक्कम राहील ती ज्याच्यात साम्य उद्देश असतील आणि जी १२ (अ) प्रमाणे प्राधीकर अधिकारी यांच्याकडे नोंद करण्यात येतील कोणत्याही परिस्थितीत राहीलेले पैसे सभासदांना देण्यात येणार नाहीत.

**दाखला**

असे प्रमाणित करण्यात येते की, '' **श्री.संत सावता माळी शिक्षण प्रसारक मंडळ ''द्वारा-श्री. मच्छिंद्र रामचंद्र जाधव, गोजूबावी ता.बारामती, जि.पुणे** या संस्थेच्या नियम व नियमावलीची ही खरी व सत्य प्रत आहे.

स्थळ : पुणे

दिनांक : ३/१/२०१३

| | | |
|---|---|---|
| श्री.मच्छिंद्र रामचंद्र जाधव | श्री. राहूल रामचंद्र जाधव | सौ.अश्विनी मच्छिंद्र जाधव |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी |

Asst. Charity Commissioner, Pune

सही शिक्याची खरी नक्कल

२२/४/२०१६

मी नक्कल तयार केली
मी वाचली

# परिशिष्ट

## ( कानून १३ (१) पहा)

पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन ऑफिस येथे ठेवनेत आलेल्या रजिस्टरात नोंदविलेल्या पब्लिक ट्रस्टच्या केलेल्या नोंदीतील झालेल्या बदलाबाबत अगर इस्ट अशा करावयाच्या बदलाबाबतचा करावयाचा रिपोर्ट :

सार्वजनिक ट्रस्टचे नाव :- " श्री संत सावता माळी शिक्षण प्रसारक मंडळ "


सार्वजनिक ट्रस्टचा पता :- मु.पो. गोजूबावी, ता.बारामती, जि. पुणे

सार्वजनिक ट्रस्टचा रजिस्टर नंबर :- एफ – ४६२११/(पुणे)

| बदलाचे स्वरूप | बदलाचे कारण | शेरा |
|---|---|---|
| परिशिष्ट एकच्या उताऱ्यावरून न्यासाच्या विश्वस्त मंडळातील खालील पदाधिकारी व सदस्यांची नावे व पदे दिनांक १३/०४/२०१३ ते १२/०४/२०१८ पर्यंत कमी करण्यात यावे.<br><br>१. श्री. मच्छिंद्र रामचंद्र जाधव - अध्यक्ष, वय -२८ व्यवसाय - नोकरी, राहणार – मु.पो. गोजूबावी ता. बारामती जि पुणे – ४१३१०२.<br><br>२. श्री. राहूल रामचंद्र जाधव - उपाध्यक्ष, वय - , ३० व्यवसाय - नोकरी , राहणार – मु.पो. गोजूबावी ता. बारामती जि पुणे – ४१३१०२.<br><br>३. सौ. आश्विनी मच्छिंद्र जाधव – सेक्रेटरी, वय - २८, व्यवसाय - नोकरी , राहणार – मु.पो. गोजूबावी ता. बारामती जि पुणे – ४१३१०२.<br><br>४. कु. इरावती नंदकुमार फुले – खजिनदार, वय – २३, व्यवसाय – नोकरी, राहणार – मु.पो. सणसर ता. बारामती जि पुणे – ४१३१०४. | या संस्थेची दिनांक १३/०४/२०१८ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा होउन त्यात दिनांक १३/०४/२०१८ ते १२ /०४/२०२३ या पाच वर्षाकरिता मागीलच कार्यकारणीची फेर निवड करण्यात आली. | १. वकीलपत्र<br><br>२. दाखल कागदपत्रांची यादी<br><br>३. डिलेकंडोनेशन अर्ज<br><br>४. डिलेकंडोनेशनचे प्रतिज्ञापत्र<br><br>५.दि.१३/०४/२०१८रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची काढलेली नोटीसची झेरोक्स प्रत.<br><br>६.दि.१३/०४/२०१८रोजीच्या वार्षिक सभेची नोटीस मिळाल्याचा पुरावा.<br><br>७. दि. १३/०४/२०१८ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या ठरावाची झेरोक्स प्रत.<br><br>८. दि. १३/०४/२०१८ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेला हजर असलेल्या सभासदांची नावे व सह्या.<br><br>९. सभासदांचे ना हरकत पत्र |

अर्ज क्र. 2172
अर्जदाराचे नांव : ॲड. [illegible]
नक्कल मिळाली तो दि. 25-04-2023

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग, पुणे.


Rs.10
COURT FEE
INDIA
भारत
दस रुपये
TEN RUPEES
SANGITAA

| | | |
|---|---|---|
| ५. सौ. रुपाली राहुल जाधव - सदस्य, वय –, २४ व्यवसाय - गृहिणी , राहणार - मु.पो. गोजूबावी ता. बारामती जि पुणे – ४१३१०२.<br><br>६.सौ. सुनिता नंदकुमार फुले - सदस्य, वय –, ५३ व्यवसाय - नोकरी, राहणार – मु.पो. सणसर ता. बारामती जि पुणे – ४१३१०२.<br><br>७. श्री. रामचंद्र निवृत्ती जाधव - सदस्य , वय – ५२ व्यवसाय - शेती, राहणार - मु.पो. गोजूबावी ता. बारामती जि पुणे – ४१३१०२.<br><br>**परिशिष्ट एकच्या उताऱ्यावरून न्यासाच्या विश्वस्त मंडळातील खालील पदाधिकारी व सदस्यांची नावे व पदे हि दिनांक १३/०४/२०१८ ते १२/०४/२०२३ पर्यंत नोंद करण्यात यावीत.**<br><br>१. श्री. मच्छिंद्र रामचंद्र जाधव - अध्यक्ष, वय -३३ व्यवसाय - नोकरी, राहणार – मु.पो. गोजूबावी ता. बारामती जि पुणे – ४१३१०२.<br><br>२. श्री. राहूल रामचंद्र जाधव - उपाध्यक्ष, वय - , ३५ व्यवसाय - नोकरी , राहणार – मु.पो. गोजूबावी ता. बारामती जि पुणे – ४१३१०२.<br><br>३. सौ. आश्विनी मच्छिंद्र जाधव – सेक्रेटरी, वय - ३३ व्यवसाय - नोकरी , राहणार – मु.पो. गोजूबावी ता. बारामती जि पुणे – ४१३१०२. | | १०. सभासदांचे संमती पत्र<br><br>११. संस्था नोंदणी सन१८६० च्या प्रमाणपत्राची सत्य प्रत.<br><br>१२. ट्रस्ट नोंदणी सन १९५० च्या प्रमाणपत्राची सत्य प्रत.<br><br>१३. ज्ञापन व नियम व नियमावलीची प्रमाणित सत्य प्रत.<br><br>१४. सभासद यादी |

| | | |
|---|---|---|
| ४. कु. इरावती नंदकुमार फुले – **खजिनदार**, वय – २८ व्यवसाय – **नोकरी**, राहणार – मु.पो. सणसर ता. बारामती जि पुणे – ४१३१०४.<br><br>५. सौ. रुपाली राहुल जाधव - **सदस्य**, वय –, २९ व्यवसाय - गृहिणी , राहणार - मु.पो. गोजूबावी ता. बारामती जि पुणे – ४१३१०२.<br><br>६.सौ. सुनिता नंदकुमार फुले - **सदस्य**, वय – , ५८ व्यवसाय - **नोकरी**, राहणार – मु.पो. सणसर ता. बारामती जि पुणे – ४१३१०२.<br><br>७. श्री. रामचंद्र निवृत्ती जाधव - **सदस्य** , वय – ५७ व्यवसाय - शेती, राहणार - मु.पो. गोजूबावी ता. बारामती जि पुणे – ४१३१०२. | | |

दिनांक : 16 / 02/२०२३

रिपोर्ट करणाऱ्या ट्रस्टीची सही

( श्री. मच्छिंद्र रामचंद्र जाधव )

अर्जदार / अध्यक्ष

# -: पडताळा :-

मी उपनिर्दिष्ट श्री. मच्छिंद्र रामचंद्र जाधव - अध्यक्ष, वय -३८, व्यवसाय - नोकरी, राहणार – मु.पो. गोजूबावी ता. बारामती जि पुणे – ४१३१०२. येथील रहिवासी असून प्रतीज्ञापुर्वक इकरार करतो कि, वरील अर्जात नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरी व बरोबर आहे.

येणेप्रमाणे पुणे येथे प्रतिज्ञापूर्वक इकरार केला असे .

स्थळ : पुणे

दिनांक :16 /02/ २०२३

( श्री. मच्छिद्र रामचंद्र जाधव )

अर्जदार / अध्यक्ष

ADV. SUNIL DOULAT DHIWAR
BA. LL.B.
Ganesh Nagar, Dange Chowk,
Chinchwad Gaon, Pune-33.
Mob: 9890025452

Solemnly affirmed before me
that the facts mentioned in
application are true to the
best of his information and belief
by Shri Machhindra Ramchandra Jadhav
who is identified before me
by Adv. Sunil D. Dhiwar
Whom I personally Known ad. reg. - 7013 9185 2062
Date : 16/02/2023

16.02.2023
Superintendent
Public Trust Registration Office
Pune Region, Pune

## मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१, पुणे विभाग, पुणे यांचेसमोर

बदल अर्ज क्र :- ४८७/२०२३.

न्यासाचे नाव :- श्री संत सावता माळी शिक्षण प्रसारक मंडळ

नोंदणी क्र :- एफ/४६२११/पुणे

कलम :- २२

### निशानी क्रमांक ०१ वरील आदेश
(दि.१८.०४.२०२३)

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने म.सा.वि.व्य.अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये कार्यकारी मंडळातील विश्वस्तांची मुदत संपलेने झालेल्या बदलाची नोंद परिशिष्ट-१ वर घेणेकरीता दाखल केलेला आहे. अर्ज वादरहित आहे.

२. अर्ज नि.क्र.१ चे अवलोकन केले असता, न्यासाची वार्षिक सर्वसाधारण सभा दि.१३.०४.२०१८ रोजी होऊन त्यानुसार जुन्या कार्यकारी मंडळाची मुदत संपलेने नविन कार्यकारी मंडळाची मुदत दि.१३.०४.२०१८ ते दि.१२.०४.२०२३ या कालावधीकरिता निवड करणेत आल्याचे दिसुन येते. .

३. बदल अर्ज दाखल करणेस झालेला विलंब, विलंब माफी अर्जावर सशुल्क माफ करणेत आला आहे. अर्जदाराने आदेशाची पुर्तता केली आहे.

४. अर्जदाराने अर्जासोबत सभेची सुचना व सुचना पोहोच, सभेचे इतिवृत्त उपस्थित सभासद यादीसह, ना हरकत पत्र, संमतीपत्र, सभासद यादी, नियम नियमावली व नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत, अर्जातील कथनाच्या पृष्ठयार्थ अर्जदाराचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र, पुरावा संपल्याची पुरसिस इ.कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

18/04/23

५. नि.क्र. १ नुसार कळविलेला बदल व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता, सदर बदल हा न्यासाच्या नियम नियमावलीतील तरतूदींना अनुसरुन केला असल्यामुळे झालेला बदल वैध व कायदेशीर असल्याचे दिसुन येते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश करते.:-

## आदेश

१. बदल अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. परिशिष्ट १ वर नोंद घेण्यात यावी.

18/04/23

ठिकाण : पुणे
दिनांक : १८.०४.२०२३.

(आर. डी. पुनसे)
सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१,
पुणे विभाग, पुणे.

मी नक्कल तयार केली
मी वाचली
मी रुजवात केली

सही शिक्क्याची खरी नक्कल
25.4.2023
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग, पुणे.